**RNI No. MAHBIL /2009/31733**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक १३३]  गुरुवार, ऑक्टोबर १५, २०२६/ आश्विन २३, शके १९४८  [पृष्ठे २, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४२८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १३ ऑक्टोबर २०२६.

**अधिसूचना**

**वैध मापनशास्त्र अधिनियम, २००९.**

क्रमांक वैमाशा-२०२५/प्र.क्र.७८/ग्रासं-३.— वैध मापन शास्त्र अधिनियम, २००९ (२०१० चा १) च्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि या संबंधात महाराष्ट्र शासनास समर्थ करण्याऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून व या अधिनियमाच्या कलम ५३ च्या पोट-कलम (१) नुसार केंद्र शासनाशी पूर्वविचार विनिमय केल्यानंतर याद्वारे महाराष्ट्र वैध मापन शास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

१. या नियमांना " महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) (पहिली सुधारणा) नियम, २०२६" असे म्हणता येईल.

२. महाराष्ट्र वैध मापनशास्त्र (अंमलबजावणी) नियम, २०११ मधील नियम ४ च्या पोट-नियम (३) ऐवजी खालील पोट-नियम समाविष्ट केला जाईल, म्हणजेच :—

"(३) पोट-नियम (१) आणि (२) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही किरकोळ (रिटेल) व्यवहारात फक्त वर्ग 'अ' (Class A) किंवा वर्ग 'ब' (Class B) श्रेणीचे दांडी तराजू (beam scale), किंवा १ मिग्रॅ. (१ mg.) चे पडताळणी मापन अंतर (verification scale interval) असलेले विशेष अचूकतेचे (वर्ग I) किंवा उच्च अचूकतेचे (वर्ग II) अस्वयंचलित तोलन उपकरण (non-automatic weighing instrument) वापरले जाईल."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. संजीव कुमार,**
शासनाचे सचिव.

## FOOD, CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT

Mantralaya, Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk,
Mumbai 400 032, Dated 13th October, 2026.

*NOTIFICATION*

Legal Metrology Act, 2009.

No. LMA-2025/C.R 78/CP-3.— In exercise of the powers conferred by sub-section (*1*) section 53 of the Legal Metrology Act, 2009 (1 of 2010), and of all other powers enabling it in that behalf and in its application to the State of Maharashtra, and after consultation with the Central Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Maharashtra Metrology (Enforcement) Rules, 2011, namely :—

1. These rules may be called the Maharashtra Legal Metrology (Enforcement) (First Amendment) Rules, 2026.

2. In Rule 4 of the Maharashtra Legal Metrology (Enforcement) Rules, 2011, for sub sub-rule (*3*), the following sub-rule be substituted, namely :—

" (*3*) Only beam scale of class A or class B category or a non-automatic weighing instrument of special accuracy (class I) or high accuracy (class II) having verification scale interval of 1mg. shall be used in any retail transaction referred to in sub-rules (*1*) and (*2*)."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Dr. SANJEEV KUMAR,
Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.